ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

Volume-X, Issues-III May - June 2021

# भारतातील प्रौढ शिक्षणाचा इतिहास

संशोधिका
रंजना पुनमचंद शिंगाडे
संशोधक विद्यार्थी
शिक्षणशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

मार्गदर्शक
डॉ. आनंद माधवराव वाघ
सहयोगी प्राध्यापक
आजीवन शिक्षण व विस्तार विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**प्रस्ताविक :**

मानवी जीवनात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिक्षणाशिवाय मनुष्याच्या सर्वांगिण विकास होऊ शकत नाही. किमान साक्षर व्यक्ती असल्याशिवाय त्या व्यक्तीला जीवनात आत्मविश्वासाने जीवन जगता येत नाही. शिक्षण, साक्षरता यामुळे व्यक्तीमध्ये कौशल्य प्राप्त होतात. व्यावहारिक कौशल्ये, व्यावसायिक कौशल्ये, बोलण्यात आत्मविश्वास, जीवन जगण्यात आत्मविश्वास पर्यायाने अडचणीवर मात करण्याचे कौशल्ये व्यक्तीला साक्षरतेमुळे येते. साक्षरतेशिवाय व्यक्तीचा, समाजाचा, एकंदर राष्ट्राचा विकास होऊ शकत नाही. म्हणून साक्षरता वाढविणे, प्रौढ शिक्षण मोहिमेला गती देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

Aarhat Publication & Aarhat Journalsis licensed Based on a work athttp://www.aarhat.com/eiirj/

ज्या-ज्या राष्ट्राची साक्षरतेची प्रगती समाधानकारक आहे. त्या-त्या राष्ट्राचा विकास झपाट्याने झालेला दिसून येतो. एवढेच नव्हे तर जे समाज उच्चशिक्षित आहेत त्या समाजाचा विकास ही झपाट्याने झालेला दिसून येतो. ज्या-ज्या समाजाची, स्त्रियांची मागास जाती-जमातीची साक्षरता कमी आहे त्यांची साक्षरता वाढविणे हे भारत सरकारचे महत्त्वाचे उद्दिष्ट राहिलेले आहे.

निरक्षरता ही व्यक्तीला, समाजाला, देशाला अधोगतीकडे नेते. निरक्षरतेमुळे विविध सामाजिक समस्या निर्माण होतात. त्या समस्या कमी करण्याकरीता साक्षरता वाढविणे हे त्यावरील रामबाण औषध आहे.

साक्षर उच्चशिक्षित व्यक्तीकडे विविध कौशल्ये येत असतात. पर्यायाने जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्ये येत असल्यामुळे साक्षर व्यक्ती राष्ट्राचे भांडवल ठरते. समाजाच्या गरजा, देशाच्या गरजा, सामाजिक जाणिव जागृती, पर्यावरणीय जाणीव ही शिक्षणाशिवाय प्राप्त होऊ शकत नाही. तसेच साक्षरतेमुळे सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्यक्तीच्या अंतर्गत सुप्त गुणांचा विकास होतो. काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर, माया या षडरिपूवर विजय केवळ चांगल्या प्रकारे साक्षर झालेला व्यक्ती मिळवितो. त्यामुळे सामाजिक कलह कमी होतात.

त्यामुळे साक्षरता चळवळ, प्रौढ शिक्षण चळवळीचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यातून साक्षरता वाढीस पूरक ठरणाऱ्या घटकांचा आपल्याला बोध होतो. त्यामुळे भारतातील प्रौढ शिक्षण चळवळीचा अभ्यास होणे महत्वाचे आहे.

**प्रौढ शिक्षण संकल्पना :**

डॉ. लिंग यांचे प्रौढ शिक्षणाविषयी मतांचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, त्यांच्या मते, ज्या लोकांना लिहता, वाचता येत नाही अशा प्रचंड समुदायापर्यंत पोहचायचे कसे हा प्रश्न आहे. डॉ. लिंग यांच्या मते, प्रौढ साक्षरतेचा लढा हा सर्वप्रथम शहरात सुरु करायला पाहिजे. प्रशासनामधील जे उच्च पदस्थ अधिकारी वर्ग आहेत त्यांनी स्वयंफूर्तीने ह्या लढ्यात सहभाग घ्यायला हवा. लोकांना असे वाटायला हवे की, निरक्षरता दूर करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. तसेच ज्या गावातील शाळा आहेत तेथील शिक्षकांनी शाळेच्या वेळेनंतर एखादा तास ज्यादा प्रौढांना (निरक्षर) शिकण्यास तयार केले पाहिजे. तसेच माध्यमिक शाळेतील जे विद्यार्थी आहेत त्यांना सुद्धा शाळा संपल्यानंतर दररोज एक तास निरक्षर व्यक्तींना शिकवले पाहिजे. तसे विद्यार्थ्यांना शिक्षकांनी अध्यापन करण्यास प्रोत्साहित केले पाहिजे. उन्हाळयात आम्ही उघड्यावर अंगणशाळा सुरु केल्या आहेत. काही ठिकाणी २०० ते ४०० किंवा प्रौढ असणारे वर्ग आहेत. त्यांना दोन किंवा तीन शिक्षक त्यांना सायंकाळी उघड्या जागेत चांगल्या प्रकारे शिकवू शकतात. तसेच गृहशाळेत देखील त्यांना शिक्षण देता येते. आपण कुटूंब प्रमुखावर देखील नोकरदार स्त्री-पुरुषांना साक्षर करण्याची जबाबदारी देऊ शकतो. तसेच काही फिरत्या शिक्षकांच्या माध्यमातून देखील निरक्षरांना साक्षर करता येते. अशा प्रकारे निरक्षरापर्यंत पोहचण्याचे अनेक मार्ग आहेत असे डॉ. लिंग यांचे मत आहे.

प्रौढ शिक्षण म्हणजे "प्रौढांना लिहता, वाचता येणे तसेच सोपे हिशोब करता येणे. म्हणजे प्रौढ शिक्षण होय." असे आपल्या भारतात पारतंत्र्यात विकसित होती. वरील व्याख्येवरून आपल्याला असे लक्षात येते की, प्रत्येक प्रौढ व्यक्तीला अक्षरज्ञान असायला हवे. त्याला दैनंदिन व्यवहारातील हिशोब करता यायला हवे. सोपी पुस्तके वाचता यायला हवी, साक्षरी करता यायला हवी.

चाकोरी बाहेरील शिक्षणाचा वापर या करिता केला जातो. धंदे, शिक्षण, हस्तकौशल्य, शाळाबाह्य प्रौढांना शिकविले जाते. प्रौढ शिक्षण केंद्रात व्यक्तीमत्व विकासाकरीता व उत्पादक व्यवसायाकरिता शिक्षण दिले जाते. तसेच इंग्रजी भाषा शिकण्याकरीता मंत्रालयाने काही केंद्र प्रस्थापित केली आहे.

प्रौढ शिक्षणामध्ये औपचारिक शिक्षणाशिवाय इतर अनौपचारिक शिक्षणाचा वापर केला जातो. त्यामुळे प्रौढांना शिक्षणाविषयी आवड निर्माण होते. तसेच त्यांना शिक्षण घेण्यात आनंद निर्माण होतो. तसेच प्रौढ शिक्षण वर्गात विविध हस्तकौशलये शिकल्यामुळे त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. परिणामी त्यांचा व्यक्तीमत्व विकास होण्यास मदत होते.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर प्रौढ शिक्षणाची संकल्पना देखील नव्याने विकसित झाली. १९६२ मध्ये जागतिक साक्षरता परिषद भरली होती. त्यामध्ये त्यांनी प्रौढ शिक्षणाची व्याख्या देखील केली आहे. ती अशी "प्रौढ शिक्षण म्हणजे प्रौढाला रोजचे वर्तमानपत्र वाचता येणे किंवा पाच वर्षे शालेय शिक्षण घेतलेल्या मुला इतके म्हणजेच इयत्ता ५ वी पास झालेल्या मुलाइतके ज्ञान प्रत्येक प्रौढाला येणे म्हणजे प्रौढ शिक्षण होय." अशा प्रकारची व्यापक व्याख्या ह्या जागतिक परिषदेत केली आहे. ह्या व्याख्यांचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, प्रत्येक प्रौढ व्यक्तीला विविध विषयाचे ज्ञान मिळाले पाहिजे असा होतो.

त्यानंतर १९६५ साली इराणची राजधानी तेहरान येथे शिक्षणमंत्र्यांची एक जागतिक परिषद भरविण्यात आली होती. तेव्हा साक्षरतेविषयी, प्रौढ शिक्षणाविषयी विचार विनिमय चांगल्या प्रकारे होऊन प्रौढ शिक्षणाची चांगली संकल्पना पुढे आली. "प्रौढांना केवळ

साक्षर करणे हे अंतिम उद्दिष्ट नाही तर या साक्षरतेच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक आणि नागरिकत्वाची नवी जबाबदार भूमिका घेण्यासाठी प्रत्येक प्रौढ व्यक्तीला तयार करणे म्हणजे प्रौढ शिक्षण होय."

**प्रौढ शिक्षणाचे महत्त्व :**

प्रौढ शिक्षणामुळे प्रौढ निरक्षर व्यक्तीला अक्षरज्ञान येते, त्याला लिहता, वाचता येणे त्याला विविध हस्तकौशल्ये प्राप्त होतात. त्यामुळे त्याला आर्थिक लाभ प्राप्त होतो. प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातून प्रौढ निरक्षर व्यक्तीला धंदेवाईक शिक्षण मिळत असते. मुख्यत: प्रौढ शिक्षणाच्या महत्त्वाचा अभ्यास केला असता प्रामुख्याने प्रौढ शिक्षणाचे महत्त्व हे तीन दृष्टीकोनातून आहे. १) प्रौढ व्यक्तीच्या दृष्टीने प्रौढ शिक्षणाचे महत्त्व २) सामाजिक दृष्टीकोनातून प्रौढ शिक्षणाचे महत्त्व ३) राष्ट्रीय दृष्टीने प्रौढ शिक्षणाचे महत्त्व.

प्रौढ शिक्षणामुळे प्रत्येक निरक्षर प्रौढ हा साक्षर होतो. त्याला लिहता, वाचता येते. प्रौढ शिक्षणामुळे प्रौढ व्यक्ती स्वावलंबी होतो. तसेच प्रत्येक प्रौढाची अर्थोत्पादन क्षमता आणि परीणामी प्रौढांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होते.

प्रौढ शिक्षण योजना संदर्भात आपण महाराष्ट्राचा अभ्यास केला असता आपणास असे लक्षात येते की, प्रौढ शिक्षण योजनेअंतर्गत महाराष्ट्रामध्ये १९५९ साली ग्रामशिक्षण मोहिमेला सुरुवात झाली. महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण २५ जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्त्वावर या मोहीमेला सुरुवात झाली. त्यानंतर १९७७ मध्ये शेतकऱ्यांसाठी कार्यात्मक साक्षरतेचा प्रकल्प राबविण्यात आला. ४०० प्रकल्प प्रत्येक राज्यात राबविण्यात आले. त्यापैकी केवळ १४० प्रकल्प हे पूर्णत्वास गेलेले होते. खरेतर भारतामध्ये राष्ट्रीय प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम २ ऑक्टोबर १९७८ ला सुरु करण्यात आला. यामध्ये मुख्य भर कार्यात्मक साक्षरता आणि जाणिव जागृती यावर देण्यात आला होता. १५-३५ वर्षे या वयोगटातील प्रौढांसाठी राबविण्यात आलेला होता. वाचन, लेखन, गणन याबरोबरच सामाजिक जाणिव जागृती आणि एकूणच जीवनस्तर उंचावण्यावर भर देण्यात आला.

**भारतातील प्रौढ शिक्षण अभ्यास :**

भारतातील प्रौढ शिक्षणाची माहिती दोन भागातून घेणे आवश्यक ठरते. यातील पहिला भाग स्वातंत्र्यपूर्व काळातील असून नंतरचा भाग स्वातंत्र्योत्तर काळातील आहे.

**१) स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रौढ शिक्षण :**

भारतातील काळात जर आपण प्रौढ शिक्षणाचा अभ्यास केला असता केवळ निरक्षर प्रौढांना साक्षर करणे म्हणजे प्रौढ शिक्षण असा मर्यादित स्वरूपाचा होता. प्रौढांना अक्षरज्ञान, अंकज्ञान झाले पाहिजे त्यांना सोपी पुस्तके वाचता आली पाहिजेत, गरजेपुरते लिहता आले पाहिजे व्यवहारातील सोपी-सोपी उदाहरणे व हिशोब करता आले पाहिजे अशी अपेक्षा प्रौढ शिक्षणात होती.

प्रस्तुत व्याख्येवरून असे लक्षात येते की, औपचारिक शिक्षणातून मिळणाऱ्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा काही भाग हा प्रौढांना शिकवायचा आणि त्यांच्याकडून प्रारंभिक स्वरुपाच्या कमी कमी ज्ञानाची अपेक्षा करायची असे दिसते. ही व्याख्या फारच मर्यादित स्वरूपाची होती. वरील व्याख्येत इ.स. १९३७ साली बदल करण्यात आला. असा बदल करण्याचे कारण की, त्यावेळी देशात बऱ्याच प्रांतात कॉंग्रेसची सरकार सत्तेवर आलेली होती. ब्रिटीशांनी भारतीयांना काही मर्यादीत स्वरुपात मतदानाचा हक्क दिलेला होता व त्याची मर्यादा क्रमाक्रमाने विस्तारली जाणार होती व भविष्यकाळात आणखी काही हक्क मिळू शकतील व त्यांचा वापर लोकशाही पद्धतीने करावा लागेल त्यामुळे प्रौढ शिक्षणाची नवीन व्याख्या पुढीलप्रमाणे तयार करण्यात आली.

ती अशी "निरक्षर प्रौढांना साक्षरतेचे निकष देणारे आणि त्यांच्या ठिकाणी चांगल्या नागरिकांची क्षमता निर्माण करण्याचा प्रयत्न करणारे शिक्षण म्हणजे प्रौढ शिक्षण होय."

अशी प्रौढ शिक्षणाची नवी व व्यापक स्वरुपाची व्याख्या करण्यात आली.

**२) स्वातंत्र्योत्तर काळातील प्रौढ शिक्षण :**

भारत देश इ.स. १९४७ साली स्वतंत्र झाला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशातील लोकांना वेगळे व स्वतंत्र राष्ट्रातील नागरीक म्हणून नवी भूमिका पार पाडायची होती. त्याप्रमाणे इ.स. १९४९ साली मध्यवर्ती शिक्षण सल्लागार समितीने एक समिती नेमली. त्या समितीने आपला अहवाल सादर केला. त्या अहवालानुसार प्रौढ शिक्षणाचे स्वरुप खूप बदलले गेले.

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा प्रौढ शिक्षणाची संकल्पना वाचन, लेखन व अंकगणिताचे शिक्षण यापुरतीच मर्यादित होती. प्रौढ शिक्षण समितीने प्रौढ शिक्षणाची व्यापक संकल्पना मांडली. प्रौढांचा जीवनस्तर सुधारणे व राष्ट्रीय विकासात सहभाग घेण्यास त्यांना समर्थ करणारे शिक्षण अशी प्रौढ शिक्षण क्रमाचे संकल्पना मांडली आहे. पुढील सर्व आयोग/ समित्या व इतर अहवालातून तीच संकल्पना मान्य केलेली दिसते.

प्रौढ शिक्षणाची व्यापक उद्दिष्टे मांडली गेलेली आहेत. प्रौढ शिक्षण समितीने प्रौढांचा सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक विकास व्हावा असे सर्वसामान्य उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवलेले दिसते.

प्रौढ शिक्षणाची कोणतीही ठोस योजना प्रौढ शिक्षण समितीने मांडलेली नाही. प्रौढ शिक्षणाचे कार्यक्रम सुचविताना कोठारी आयोगाने निवडक व सर्वस्पर्शी अशा दोन्ही प्रकारच्या कार्यक्रमावर भर दिला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सार्वत्रिक साक्षरता कार्यक्रमावरच भर आहे. प्रौढ शिक्षणासाठी प्रकल्प दृष्टीकोन धोरणाने स्विकारला आहे. या कार्यक्रमामध्ये शैक्षणिक सेवाभावी संस्थांचा सहभाग असावा असे दोन्हीमध्ये म्हटले आहे. प्रत्येक शैक्षणिक संस्थेने एकतरी साक्षरता वर्ग चालवावा ही कोठारी आयोगाची शिफारस अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

अशा प्रकारे स्वातंत्र्योत्तर काळातील प्रौढ शिक्षणाची संकल्पना मांडली आहे.

**सारांश :**

भारतातील निरक्षरांची संख्या कमी करण्यासाठी किंवा साक्षरता वाढविण्यासाठी प्रौढ शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. ज्या व्यक्तीचे प्राथमिक शिक्षण जर चांगल्या प्रकारे झाले असेल तर त्याचे उच्च शिक्षण देखील चांगल्या प्रकारचे होण्यास उपयोग होतो.

वय वर्षे ५० वर्षापेक्षा कमी वयाच्या स्त्री-पुरुषास शिक्षण घेण्यास प्रोत्साहन द्यावे. त्यांना कधीही निरुत्साही करू नये.

प्रौढ शिक्षणाची सुरुवात सर्वप्रथम शहरात व नंतर ग्रामीण भागात अशी करावी व ह्याला राष्ट्रीय चळवळीचे स्वरुप द्यावे.

प्रौढ शिक्षणासाठी शाळेतील शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, वरच्या वर्गातील विद्यार्थी, अधिकारी, कुटूंब प्रमुख ह्यांची मदत घ्यावी. म्हणजे प्रौढ शिक्षण चळवळ यशस्वी होईल.

राष्ट्राचा विकास, व्यक्तीचा, समाजाचा, कुटुंबाचा विकास करण्यासाठी प्रौढ शिक्षणाची अत्यंत गरज आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात प्रौढ शिक्षण म्हणजे प्रौढांना लिहता वाचता येणे, तसेच सोपे हिशोब करता येणे म्हणजे प्रौढ शिक्षण होय.

म्हणजेच प्रत्येक प्रौढाला अक्षरज्ञान असायला पाहिजे, सोपी पुस्तके वाचता आली पाहिजेत.

राष्ट्राच्या विकासात ज्या व्यक्तीचे वय २५ ते ५० वर्षे असते त्यांचा वाटा मोठा असतो. त्यामुळे जर राष्ट्राचा विकास चांगल्या प्रकारे व्हायचा असेल तर या वयोगटातील व्यक्तींना प्रौढ शिक्षण मिळायला हवे.

प्रौढ शिक्षण कार्यक्रमामध्ये कौशल्यवृत्ती, गरीबी निवारण, राष्ट्रीय एकात्मता या बाबींचा समावेश असायला हवा. त्यामुळे व्यक्तीचा व्यक्तीमत्व विकास होतो.

प्रौढ शिक्षण कार्यक्रमामध्ये अनौपचारिक शिक्षण दिल्या जाते. प्रौढांना व्यवसाय शिक्षण, धंदे शिक्षण, हस्तकौशल्य शिक्षण दिल्या जाते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर खऱ्या अर्थाने प्रौढ शिक्षणाची संकल्पनेला व्यापक स्वरुप प्राप्त झाले.

जागतिक साक्षरता परिषदेने व सामाजिक साक्षरता परिषदेने प्रौढ शिक्षणाची व्याख्या "प्रौढ शिक्षण म्हणजे प्रौढाला रोजचे वर्तमानपत्र वाचता येणे किंवा पाच वर्षे शालेय शिक्षण घेतलेल्या मुलाइतके म्हणजे इयत्ता ५ वी पास झालेल्या मुलाइतके ज्ञान प्रत्येक प्रौढाला येणे म्हणजे प्रौढ शिक्षण होय अशी केली आहे.

युनेस्कोच्या व्याख्येवरून प्रौढ शिक्षण म्हणजे केवळ प्रौढांना साक्षर करणे नव्हे तर साक्षरतेच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक आणि नागरीकत्वाची नवी जबाबदारी घेण्याची भूमिका पार पाडण्यासाठी तयार करणे म्हणजे प्रौढ शिक्षण होय.

प्रौढ शिक्षणाचे महत्त्व तीन दृष्टीकोनातून सांगता येते. ते म्हणजे प्रौढ व्यक्तीच्या दृष्टीने प्रौढ शिक्षणाचे महत्त्व, सामाजिक दृष्टीकोनातून प्रौढ शिक्षणाचे महत्त्व, राष्ट्रीय दृष्टीने प्रौढ शिक्षणाचे महत्त्व.

प्रौढ शिक्षणामुळे व्यक्ती स्वावलंबी होऊ शकतो, प्रौढ व्यक्तीला लिहता वाचता येते. तसेच प्रौढांना अर्थप्राप्ती होते.

महाराष्ट्रामध्ये १९५९ साली ग्रामशिक्षण मोहिमेच्या माध्यमातून प्रौढ शिक्षणाला सुरुवात झाली.

१९७७ साली शेतकऱ्यांसाठी कार्यात्मक साक्षरतेचा प्रकल्प राबविण्यात आला. ४०० प्रकल्प प्रत्येक राज्यात राबविण्यात आले. यापैकी १४० प्रकल्प पूर्णत्वास गेले होते.

भारतामध्ये राष्ट्रीय प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम २ ऑक्टोबर १९७८ ला सुरु करण्यात आला. यामध्ये मुख्य भर कार्यात्मक साक्षरता आणि जाणीव जागृती यावर देण्यात आलेला होता.

मुख्यत: हा कार्यक्रम १५-३५ या वयोगटातील प्रौढांसाठी राबविण्यात आलेला होता.

भारतातील प्रौढ शिक्षणाचा अभ्यास हा मुख्यत: दोन भागातून करता येतो व ते भाग स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रौढ शिक्षण आणि स्वातंत्र्योत्तर काळातील प्रौढ शिक्षण.

अशा प्रकारे आपल्याला भारतातील प्रौढ शिक्षण चळवळीचे स्वरुप लक्षात येते.

**संदर्भसूची :**

१) देशपांडे के. ना. (१९९३), 'प्रौढ शिक्षण', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृ.३१.

२) उपरोक्त, पृ. ३५.

३) करंदीकर, सु. अ. (१९९३), 'प्रौढ शिक्षण', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृ. २.

४) दळवी, म. अ. (२००७), 'डायमंड सामाजिक ज्ञानकोश', नागपूर ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, पृ.४५.

५) सोहोनी बा. वि. (१९९३), 'प्रौढ शिक्षण', नुतन प्रकाशन, पुणे, पृ. ६२८.

६) www.sec.ducoop.net/education.in/pdf/beka/०७/०३/०८

७) करंदीकर, सु. ध. (१९९३), 'प्रौढ शिक्षण व निरंतर शिक्षण', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृ.३.

८) जोगळेकर, र. अ. (१९९३), 'प्रौढ शिक्षण', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृ. ४.

९) http://education.nic.in/ed५०years/y/३t/९९/०३०/htm.०७/०३/०८.

१०) उपरोक्त, पृ.५.